दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३१३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.६ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## गृहमंत्री अनिल देशमुख यांना करोनाची लागण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांना करोनाची लागण झाल्याचं समोर येत आहे. अनिल देशमुख यांनी स्वतः ट्विट करुन याबाबतची माहीती दिली आहे.

करोनाच्या काळातही अनिल देशमुख यांच्या कामाचा धडाका सुरु होता. लॉकडाऊनच्या काळात पोलिसांनी केलेल्या कामाचं कौतुकही त्यांनी वेळोवेळी केलं होतं. तसंच, पोलिसांचं मनोबल वाढवण्यासाठी ते राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात पोलिस ठाण्यांना भेटही देत होते. त्याचबरोबर नागपूर, गडचिरोली अशा भागांचा दौराही त्यांनी केला होता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यक्रमातही त्यांची उपस्थिती असायचीय मात्र, करोनाच्या अनुषंगाने ते सर्व प्रकारची काळजीही घेत होते. दरम्यानच्या काळात त्यांनी करोनाची चाचणी करुन घेतली. या चाचणीचा अहवाल पॉझिटिव्ह आला असून त्यांना तीव्र लक्षणे नसल्यानं ते घरीच क्वारंटाइन होणार असल्याचे समजते. 'माझी करोनाची चाचणी पॉझिटिव्ह आली असून माझी प्रकृती उत्तम आहे.

# पनवेलमध्ये जोरदार टाळा ठोको व हल्लाबोल ; वीज बिल माफ करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी त्यांना वेठीस धरून कारभार चालविण्याचे काम करणाऱ्या महाविकास आघाडी सरकारचा पनवेल तालुका व शहर भाजपच्या वतीने जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार आणि तीव्र शब्दात निषेध व्यक्त करत भिंगारी येथील महावितरण कार्यालयात आज (दि. ०५) टाळा ठोको व हल्लाबोल आंदोलन करण्यात आले.

दरमहा १०० युनिट बिल माफ करण्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते त्यानुसार १२ महिन्यांचे १२०० युनिटचे वीज बिल माफ करा तसेच शेतकऱ्यांचे किमान पाच वर्षे वीज कनेक्शन कापू नये, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.





या आंदोलनात भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, माजी नगराध्यक्ष संदिप पाटील, प्रभाग समिती सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेवक प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, संतोष भोईर, नगरसेविका दर्शना भोईर, राजेश्री वावेकर, रुचिता लोंढे, वृषाली वाघमारे, माजी नगरसेविका नीता माळी, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, कामगारनेते रविंद्र नाईक, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सुभाष पाटील, राखी पिंपळे, यांच्यासह कार्यकर्ते व वीजग्राहक सहभागी झाले होते.

> महाविकास आघाडी सरकार डोळे बंद करून बसलेले सरकार आहे. त्यांना सर्वसामान्य नागरिकांशी काहीही देणे घेणे नाही. वाढीव बिले कमी करून गरजेचे आहे तर ज्यांची देयक भरण्याची परिस्थिती नाही अशा गोरगरीब वीज ग्राहकांचे बिल माफ करावे.
>
> **- महापौर डॉ. कविता चौतमोल**

ठाकरे महाविकास आघाडीने राज्यातील जनतेची पिळवणूक करण्याचे ठाम केले आहे. त्यामुळेच हे सरकार जनेतला दिलासा न देता त्रास देण्याचेच काम करीत असल्याचे प्रकर्षाने दिसून येत आहे. ऊर्जा मंत्र्यांनी वीज ग्राहकांना वीज बिलासंदर्भात गोड बातमी देऊ असे जाहीर केले होते. मात्र गोड ऐवजी कटू कारवाईचा बडगा उचलला आहे. कोरोना काळात सर्वसामान्य जनता भरडून निघाली असताना राज्य सरकारने जनतेच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे होते मात्र तसे न करता महावितरणाने ७५ लाख वीज ग्राहकांना वीज जोडणी तोडण्याची नोटीस पाठवून महाराष्ट्रातील ४ कोटी जनतेला अंधारात टाकण्याचे पाप केले आहे. त्यामुळे याचा जोरदार निषेध करत वीज बिल कमी करा गोरगरिबांना बिलात माफी द्या अशी मागणी यावेळी करण्यात आली.

> तिघाडी सरकारच्या बिघाडी कारभारामुळे जनता त्रस्त झाली असल्याचे सर्वत्र चित्र पहायला मिळत आहे. वीज बिल कमी करण्याऐवजी उलट त्यामध्ये वाढ करण्याचे काम महाविकास आघाडीने करून सर्वसामान्य जनतेला वेठीस धरण्याचे पाप केले आहे. ७५ लाख वीज ग्राहकांची वीज कट करण्याचा फतवा राज सरकारने काढला आहे.. या निर्दयी सरकारचा धिक्कार करत असून सरकारला जाग न आल्यास ऊर्जा मंत्र्यांना जनता उग्र आंदोलनाचा शॉक दिल्याशिवाय राहणार नाही.
>
> **- विक्रांत पाटील, प्रदेशाध्यक्ष, युवा मोर्चा**

## संक्षिप्त...

### मानखुर्द परिसरात गोदामाला भीषण आग

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मानखुर्द येथील मंडला परिसरात असलेल्या भंगाराच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून अग्निशमन दलाचे जवान आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.

आगीचं स्वरुप इतकं भयंकर आहे की १० ते १५ फुटांपर्यंत धुराचे लोट पसरले आहेत. अग्निशमन दलाकडून लेवल- ३ची आग असल्याचे जाहीर करण्यात आले असून आगीत कोणीही गंभीर जखमी झालं नाहीये.

मानखुर्द घाटकोपर लिंक रोडवरील मंडाला येथे झोपडपट्टीच्या बाजूला असलेल्या भंगाराच्या सामानला ही आग लागली आहे. आगीच्या ठिकाणीच डंपिंग ग्राउंड असल्याचंही सांगण्यात येत आहे. दरम्यान, बाजूला झोपडपट्टी असल्यानं तेथील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आगीबाबत माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आहेत. फायर इंजिनच्या साह्याने आग आटोक्यात आणण्याचे युद्धपा-तळीवर प्रयत्न सुरु आहेत.



## केंद्र सरकारच्या पेट्रोल डिझेल व गॅस सिलेंडर दरवाढीच्या विरोधात शिवसेनेचा दणदणीत मोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार व जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली आज पनवेल येथील प्रांताधिकारी कार्यालयावर केंद्र सरकारच्या पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडर दरवाढीच्या विरोधात दणदणीत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या प्रमाणात शिवसैनिकांसह महिला आघाडी व युवा सैनिक उपस्थित होते. यानिमित्ताने मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी बैलगाडी व सायकल रॅली काढून मोर्चा काढण्यात आला होता.

या आंदोलनात जिल्हाप्रमुख शिरीषदादा घरत, जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, सल्लागार शिरिष बुटाला, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, उपजिल्हा संघटक परेश पाटील, विधानसभा प्रमुख दिपक निकम, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उप महानगर प्रमुख दिपक घरत, तालुकाप्रमुख एकनाथ म्हात्रे, तालुका संघटक रामदास पाटील, प्रभाकर गोव-ारी, लिलाधर भोईर, शहरप्रमुख अच्युत मनोरे, सदानंद शिर्के, डी. एन. मिश्रा, राकेश गोवारी, रुपेश ठोंबरे, शंकरशेठ ठाकूर, ग्राहक संरक्षण कक्षाचे उपजिल्हाप्रमुख शशिकांत डोंगरे, युवासेना जिल्हा समन्वयक नितिन पाटील, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, अवचित राऊत, कुणाल कुरघोडे, महिला उपजिल्हा संघटक कल्पना पाटील, विधानसभा संघटक रेवती सकपाळ, महानगर संघटक ॲड.शुभांगी शेलार, रुही सुर्वे, हुस्नारा खान आदी उपस्थित होते.

> केंद्र शासनाच्या पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निषेध करताना महिला आघाडीने रस्त्यावरच चुल पेटवून भाकऱ्या थापल्या व त्या भाकऱ्या केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी प्रांताधिकारी कार्यालयात भेट दिल्या.





> केंद्र सरकारच्या दरवाढीचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत असून मोठ्या प्रमाणात या दरवाढीचा संताप व्यक्त करण्यात येत आहे. : **जिल्हाप्रमुख शिरिष घरत**

> दरवाढीमुळे सामान्यांना जगणे मुश्कील झाले आहे. मोदी सरका फक्त अदानी व अंबानी यांच्या हिताचेच निर्णय घेत असून याचा निषेध करीत आहोत : **जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील**

## सिडकोतर्फे सामाजिक व धार्मिक वापराच्या भूखंडांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्यास मंजुरी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोतर्फे शैक्षणिक, वैद्यकीय, संस्थात्मक, धर्मादाय किंवा शासकीय आणि धार्मिक वापराकरिता वाटपित करण्यात आलेल्या भूखंडांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याच्या निर्णयास नुकतीच मंजुरी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने नवी मुंबईच्या सामान्य विकास नियंत्रण नियमावलीतील (जीडीसीआर) अधिनियम क्र. १६.३(१अ)क मध्ये काही बदल करण्यात आले आहेत.

सिडकोतर्फे नवी मुंबईच्या विविध नोडमध्ये शैक्षणिक, वैद्यकीय, संस्थात्मक, धर्मादाय किंवा शासकीय कार्यालये आणि धार्मिक वापराकरिता भूखंड भाडेपट्ट्यावर वाटपित करण्यात आले आहेत. सदर भाडेपट्टाधारकांनी सिडकोकडे .../२

> या निर्णयामुळे सामाजिक व धार्मिक वापराच्या भूखंडांकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा लाभ मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होऊन त्याबाबतच्या निकषांची काटेकोरपणे पूर्तता करणाऱ्या भूखंडांना त्याचा निश्चितच लाभ मिळणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी,**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## केंद्र शासनाच्या पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडर दरवाढीच्या विरोधात शिवसेनेचा तहसिल कार्यालयावर मोर्चा



**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र शासनाच्या पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडर दरवाढीच्या विरोधात शिवसेने तर्फे जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२१ रोजी तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आले असून या संदर्भात तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांना निवेदन देण्यात आले आहे.

इंधन दर वाढ विरोधात काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या प्रमाणात शिवसैनिकांसह महिला आघाडी व युवा सेना उपस्थित होते. या मोर्चाची सुरवात शिवसेना उरण शहर शाखेपासून उरण शहरात बैलगाडीने प्रवास करत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात केंद्र सरकारच्या महागाई, कामगार विरोधी, शेतकरी कायद्या विरोधी धोरणांचा निषेध करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्या.

सदर मोर्चाची रॅली उरण बाजारपेठ फिरून उरण तहसिल कार्यालयापर्यंत नेण्यात आली. आणि .../२

## इंधन दरवाढीविरोधात शिवसैनिकांची निदर्शने पोलादपूरला महामार्गावर जमले शिवसैनिक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

देशातील पेट्रोल, डिझेल आणि गॅसदरवाढीविरोधात आंदोलन करण्यासाठी पोलादपूर तालुक्यातील शिवसैनिक मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ जमले आणि त्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. पोलादपूर तालुकाप्रमुख निलेश अहिरे यांच्या नेतृत्वाखाली शहरप्रमुख सुरेश पवार, उपशहरप्रमुख राजन पाटणकर, मंगेश नगरकर, प्रदीप भूतकर, प्रभाकर पवार तसेच अन्य शिवसैनिक दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पोल-ादपूर महाबळेश्वर महामार्ग आणि मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी असलेल्या शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ भगवा झेंडा हातात घेऊन जमले. यावेळी केंद्रसरकारने केलेल्या देशातील पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीविरोधात सर्वांनी घोषणा दिल्या आणि शांततापूर्ण शिस्तबध्दरितीने आंदोलनाची सांगता केली.



## वीज बिले माफ करा माणगाव महावितरण केंद्रावर भाजप पक्षाचा मोर्चा



**दै.रायगड नगरी । माणगाव**

महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकारच्या आणि महावितरण कंपनीने महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची मोठी लुट व फसवणूक केले असून या सरकारच्या विरोधात व महावितरण कंपनीच्या विरोधात भाजप माणगांव तालुक्याच्या वतीने संध्याकाळी ४.०० वाजता माणगांव महावितरण कंपनीच्या कार्यालयावर 'टाळा ठोको व हल्लाबोल'आंदोलन करण्यात आले.

यावेळी संजय आप्पाशेट ढवळे भाजपचे माणगांव तालुका अध्यक्ष यांनी पुढे बोलताना असे सांगितले की देशभरात तसेच महाराष्ट्रात कोरोना प्रादुर्भावाचे महा संकट असताना तसेच महाराष्ट्रात ४ कोटी जनता व ७५ लाख विज ग्राहक असताना या ग्राहकाचे कनेक्शन तोडण्याच्या नोटीसा या महावितरण कंपनीने पाठविलेल्या आहेत. तसेच काहीचे कनेक्शन देखील कापले असून. महाराष्ट्रातील जनता या महा संकटात आसताना हे काम प्रस्थापित महाविकास आघाडीच्या सरकारने व महावितरण कपनीने केले आहे. यांचे फळ जनता त्यांना नक्कीच योग्य वेळी देईल. तसेच महावितरण कंपनीने तर रायगड जिल्हात माणगांव तालुक्यात निसर्ग .../२

## 'महावितरण' कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी व्हावे

### श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरातील वीज ग्राहकांची मागणी



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील वीज वितरण कंपनीचे कार्यालय हे एस. टी. स्थानकापासुन साधारण दिड किलोमीटर अंतरावर असल्यामुळे वीज ग्राहकांना खुपच पायपिट व मनस्ताप सहन करावा लागत आहे. विद्युत मंडळाचे कार्यालय बोर्लीपंचतन च्या मध्यवर्ती ठिकाणी असावे अशी मागणी परिसरातील वीज ग्राहकांची सातत्याने होत आहे. सध्या हे कार्यालय वांजळे रोड येथे आहे.

गेली चार ते पाच वर्ष वीज ग्राहाकांनी वारंवार तक्रार करुन देखील महावितरण अधीकारी कडून सदर बाबीकडे दुर्लक्ष केले जात आहे, ही मोठि खेदाची बाब आहे. वीज वितरण कंपनीचे बोर्लीपचंतन कार्यालयाचे कार्य शेत्रात दिघी, कुडगाव, सर्वा, नानवली, करलास, हरवीत, वे-ळास, वडवली, शिस्ते, कापोली, .../२

# शेतकऱ्यांसाठी हॅशटॅगयुद्ध

कृषी कायद्याच्या विरोधात दिल्लीच्या सीमेवर गेल्या दोन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाकडे जगाचे लक्ष वेधले जाणे आणि आंतरराष्ट्रीय चळवळींतील कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, कलावंत आदींकडून समर्थनार्थ प्रतिक्रिया उमटणे ही तशी धक्कादायक बाब नाही. जागतिकीकरणाच्या आणि सोशल मीडियाच्या काळात स्थानिक बाबींना वैश्विक स्वरूप येतेच. शेतकरी आंदोलनाच्या आरंभीच कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी; तसेच त्यांच्या मंत्रिमंडळातील काही शीख सहकाऱ्यांनी पाठिंबा व्यक्त करून, त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूपही दिले. कॅनडामध्ये शीख समाज लक्षणीय प्रमाणात असणे आणि ट्रुडो यांचे राजकारण त्यावर अवलंबून असणेही त्याला कारणीभूत होते. ट्रुडो आणि कंपनीच्या वक्तव्यांची तात्काळ दखल घेऊन 'भारताच्या अंतर्गत मुद्द्यात नाक खुपसण्याची गरज नसल्याचे' खरमरीत उत्तर भारताने लगेच दिले होते. मात्र, आंदोलक आणि सरकार यांच्यातील तिढा कायमच राहिल्याने या आंदोलनाची दखल जगभर घेतली जात होतीच. प्रजासत्ताक दिनी निघालेल्या ट्रॅक्टर रॅलीतील घटनांमुळे जगभर त्याची चर्चा वाढली आहे. पर्यावरणाच्या मुद्द्यावरून महासत्तांना खडसावणाऱ्या ग्रेटा थनबर्ग या किशोरीने ट्विटरद्वारे आंदोलनाला पाठिंबा दिला. पाठोपाठ रेहाना या ख्यातनाम गायिकेने समर्थन जाहीर करीत, 'आपण याबाबत का बोलत नाही,' असा सवाल केला. अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस यांची पुतणी आणि लेखिका मीना हॅरिसही बोलल्या. ब्रिटन आणि अमेरिकेतील काही लोकप्रतिनिधींनीही चर्चा सुरू केली. परिणामी जागतिक सोशल मीडियाचा एक अवकाश या आंदोलनाने व्यापला. परराष्ट्र खात्याने त्याची दखल घेतली. यामागे हितसंबंधी शक्ती असून, त्यांचा अजेंडा यशस्वी होऊ दिला जाणार नाही, असा इशारा भारताने दिला. सचिन तेंडुलकरसह देशातील काही खेळाडू आणि चित्रपट कलावंतांनीही या सेलिब्रिटींना उत्तर देऊन, आपले प्रश्न सोडविण्यासाठी भारत सक्षम असल्याचे म्हटले. ट्विटरवरील या हॅशटॅगयुद्धाने शेतकरी आंदोलनाचा विषय काही काळ जागतिक स्तरावर चर्चेत ठेवला हे खरे. देशांतर्गत प्रश्नावर जगाने दखल घेणे हा एक प्रकारचा हस्तक्षेपच; परंतु अमेरिकेतील ' ब्लॅक लाइव्ह मॅटर' चळवळ असो, की हाँगकाँगमधील आंदोलन; रशियन नेत्यावरील विषप्रयोग असो की म्यानमारमधील बंडाळी; अशा घटनांची जगभर चर्चा होते. भारत हा जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. येथील घटनांकडे जग उत्सुकतेने पाहते आहे. यामुळे शेतकरी आंदोलनावरच्या आंतरराष्ट्रीय वादंगाने विचलित होण्याची गरज नाही. हा प्रश्न देशांतर्गत असून, तो सोडविण्यासाठी भारत आणि येथील लोकशाही समर्थ आहे. त्यामध्ये बाह्य मंडळींनी उठाठेव करण्याची काही गरज नाही. तसे कोणी करीत असेल, तर त्यांना प्रत्युत्तर द्यायला हवे; परंतु त्याचवेळी हा प्रश्न चिघळू न देता तो सोडविण्यासाठी गंभीर प्रयत्नांचीही आवश्यकता आहे. कृषी कायदे मागे घेण्याच्या मागणीवर आंदोलक ठाम आहेत; तर 'कायद्यांना स्थगिती दिली आहे, त्यांमधील प्रत्येक मुद्द्यांवर चर्चेसाठी तयार आहोत,' अशी सरकारची भूमिका आहे. दोहोंमध्ये चर्चेच्या अकरा फेऱ्याही झालेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणी समिती नेमून चर्चेसाठी नवे व्यासपीठ दिले आहे. मात्र, यातून काहीही निघालेले नाही. प्रजासत्ताक दिनी झालेल्या हिंसाचारानंतर आंदोलन संपेल असे वाटत असतानाच नवीन ऊर्जा मिळून आंदोलन पुन्हा जोमाने सुरू झाले. सरकारही आक्रमक बनले. सरकारने गुन्हे दाखल केले, आंदोलन सुरू असलेल्या भागात तटबंदी उभारली, तेथील इंटरनेट सेवाही तोडली. आंदोलकांशी चर्चेसाठी सरकार फोनवरील एका हाकेच्या अंतरावर असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले असले, तरी त्यासाठी सरकारला पोषक स्थिती निर्माण करावी लागेल. आंदोलनाला बदनाम करण्याने किंवा ते गुंडाळण्यासाठी प्रयत्न करण्याने याबाबत जी काही सहानुभूती आहे, तीही सरकार गमावू शकते. तीनही कायदे सरकारने संसदेत बहुमताने मंजूर करून घेतले आहे; त्याला त्यावेळी पाठिंबा देणारे किंवा सोयीने सभात्याग करणारे काही पक्ष आज आंदोलनाला पाठिंबा देत आहेत. या आंदोलनाने सर्व राजकीय पक्षांचा आणि नेत्यांचा दुटप्पीपणा उघड केला. आंदोलन थांबावे आणि शेतकऱ्यांना न्याय मिळावा, असे विरोधकांना वाटत असेल, तर त्यांनीही सरकारसमोर तोडग्यासाठी पर्याय ठेवावेत. थोडक्यात, चिघळणारे आंदोलन आणि वाढता विरोध पाहता कायद्यांना व्यापक समर्थन मिळविण्यासाठी सरकारला त्यांत काही बदल करावे लागतील असे दिसते. त्यामुळे, सरकारने नमते घेण्याची आणि आंदोलकांसह सर्व विरोधकांपर्यंत पोहोचण्याची गरज आहे. प्रकरण हाताबाहेर जाऊ द्यायचे नसेल, तर पंतप्रधानांनी आंदोलकांची भेट घ्यायला हवी. त्याचवेळी, तुटेपर्यंत ताणायचे नसते याचे भान आंदोलकांनाही यायला हवे.

# खांदेश्वर रेल्वे स्थानकाची सुरक्षा धोक्यात ; रेल्वे फलाटावर दुचाकी वाहनांची पार्कींग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हर्बर रेल्वे मार्गावरून चालणाऱ्या रेल्वे ची सुरक्षा ही धोक्यात आली आहे. हर्बर मार्गावरील खांदेश्वर रेल्वे स्थानकातच दुचाकी वाहनचालकांनी आपली पार्कींग व्यवस्था सुरू केले आहे. रेल्वे फलाट आणि स्थानकाच्या इमारतीमध्ये वाहन पार्कींग मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने. खादेश्वर रेल्वे स्थानकाची सुरक्षा घोक्यात आली आहे. विशेष म्हणजे या पार्कींग मध्ये जी आर पी आणि सेन्ट्रल रेल्वे पोलिसांच्या गाड्याचा मोठा समावेश आहे. यांच्यावर कारवाई कोण करणार असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

हर्बर मार्गावरील मानसरोवर आणि पनवेल स्थानका मधील हे खांदेश्वर रेल्वे स्थानका हे अंत्यत महत्वाचे स्थानक मानले जाते. या स्थानकातून दररोज हजारो प्रवाशी खांदेश्वर ते वाशी, मुंबई या ठिकाणी प्रवास करतात, मुबई ठिकाणी कामा निमित्ताने तसेच कार्यालयीन कामकाजासाठी जाणाऱ्यांची संख्या ही हजारो आहे. पहाटे ६ वाजल्या पासून या स्थानकांवर रेल्वे ने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची लगबग सुरू असते. सध्या कोरोनाच्या महामारीमुळे लोकल सेवा तब्बल ११ महिने बंद होती, ही बंद सेवा आता १ फेब्रुवारी पासून सर्वांसाठी सुरू करण्यात आली आहे. १ फेब्रुवारी पूर्वी केवळ अत्यावश्यक सेवेसाठी रेल्वेच्या प्रवासाला सुरवात होती. मात्र आत निश्चित केलेल्या वेळा पत्रकानुसार




रेल्वे सेवा सगळ्यासाठी खुली करण्यात आली आहे. त्यामुळे आता रेल्वेला तुफान गर्दी दिसून येत आहे. या मध्ये खांदेश्वर रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. मात्र हजारोच्या संख्येने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची सुरक्षा ही धोक्यात आली आहे. याला कारण देखील तसेच आहे , या सुरक्षे कडे रेल्वे सुरक्षा बळ तसेच अन्य पोलिस यंत्रणेचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. त्या मुळे सध्या हे स्थानक धोक्यात आहे. कारण या स्थानकात चक्क दुचाकी चालकांनी आपली पार्कींग सुरू केली आहे. त्यामध्ये रेल्वे फलाट मार्गावर या दुचाकी पार्क केल्या जातात.

खांदेश्वर रेल्वे च्या तिकिट घराच्या बाजूने स्थानका कडे जाणाऱ्या बोगद्याच्या मार्गिकेत दुतर्फा दुचाकी पार्क केलेल्या दिसून येतात. एक नाही तर तब्बल शेकडो दुचाकी या ठिकाणी पार्क केलेल्या दिसून येत आहे. या दुचाकी मुळे मार्गिकेचा रस्ता अडला जातो. त्या सोबत स्थानकाची सुरक्षा धोक्यात आली आहे. एखाद्या वेळेस दुचाकीला काही दुर्घटना झाली तर पूर्ण स्थानक हे वेठीस धरले जाऊ शकते. अश्या बेजबाबदार दुचाकी वाहन चालकांवर कारवाई करण्याची मागणी होऊ लागली आहे.

रेल्वे स्थानकात वाहन पार्क करणे कायद्याने गुन्हा जरी असला तरी हा गुन्हा दुसरे तिसरे कोणीही नसून, जीआरपी , आरपीएफ आणि सेन्ट्रल रेल्वे चे कर्मचारी तुडवताना दिसून येत आहे. याच कर्मचाऱ्यांची वाहने तसेच अन्य चाकरमान्यांची वाहने पार्क करून हे मुबई ठिकाणी कामाला जातात त्या मुळे सुरक्षा ही धोक्यात आली आहे.

# श्रीराम जन्मभूमी मंदिर निर्मितीसाठी म्हसळा तालुका हिंदु संघटना भरीव अर्थसहाय्य करणार : महादेव पाटील

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कण-कण दया, क्षण-क्षण दया, हेच जीवनाचे अर्थ आहे, जो जसा मनाने देईल तेच सर्वात जास्त सामर्थ्य आहे या भावनेतून श्रीराम जन्मभूमी अर्थात अयोध्येत प्रभु श्री राम मंदिर निर्मिती करिता म्हसळा तालुकयातील हिंदु संघटना भरीव अर्थ सहाय्य करेल असे मनोगत तालुका निधी संकलनाचे आयोजित सभेला हिंदू संघटना अध्यक्ष तथा माजी सभापती महादेव पाटील यांनी सांगितले.

अयोध्येत श्री राम जन्मभूमीत २.७ एकर जमिनीत ५७.४०० क्षेत्रफळ वर्गफुट जागेत ३६० फुट लांब आणि २५३ चौरस फुट रुंदीचे ५ मंडप असलेले भव्य मंदिर उभारण्यात येणार आहे.या मंदिराचे कळस १६१ फुट इतके उंच असणार आहे.अयोध्येत प्रभु श्री रामांचे मंदिर व्हावे हे स्वप्न शेकडो वर्षानंतर प्रत्यक्ष साक्षात साकारत आहे.मंदिर निर्मितीसाठी भारतातील प्रत्येक हिंदु नागरिकाचे योगदान असावे या उद्देशाने निधी संकलनाचे कामाचे महत्त्व विषद करण्यात साठी म्हसळा हिंदु संघटनेने पदाधिकारी आणि तालुक्यातील गाव प्रमुख यांची संयुक्त सभा श्री राधाकृष्ण मंदीर म्हसळा येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाली. सभेला तालुका अध्यक्ष महादेव पाटील,सचिव महेश पवार,प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कुलाबा जिल्हा प्रचार प्रमुख विजय वेदपाठक,रायगड जिल्हा प्रमुख रवि शेट्टी, संजय ठाकुर,संपर्क अभियान प्रमुख काशिनाथ गाणेकर,म्हसळा तालुका प्रमुख यतीन करडे,कुणबी समाज अध्यक्ष महादेव पाटील,उपसभापती मधुकर गायकर,१८ गाव आगरी समाज अध्यक्ष संतोष पाटील,आगरी समाज पाच गाव अध्यक्ष महादेव गाणेकर,हिंदु संघटना विभागीय व कोळी समाज अध्यक्ष अनिल बसवत,अध्यक्ष किरण



पालांडे,अध्यक्ष निलेश मांदाडकर,गवळी समाज नेते लक्ष्मण कांबळे, शैलेश कुमार पटेल,उपाध्यक्ष गजानन गीजे,समीर बनकर,चंद्रकांत कापरे,निकेश कोकचा,बाबु शिर्के,प्रसाद पोतदार,व्यापारी संघटना अध्यक्ष नंदू सावंत आदी समाज मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते.

सुरुवातीला रा.स्वयं.संघ रायगड जिल्हा प्रमुख रवि शेट्टी यांनी प्रभु'श्री राम' मंदिर मंदिर निर्मितीवर सामुहिक गीत गायन करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. विजय वेदपाठक यांनी आयोजित सभेस उपस्थित सर्व हिंदु बांधव हे भाग्यवान आहेत.रक्तरंजित इतिहास लिहिला गेलेल्या श्री राम जन्मभुमी तीर्थक्षेत्र स्थळी आता आपण प्रत्यक्षात मंदिराचा कळस आणि त्यावरील भगवी पताका पहाणार आहोत.योद्धा आणि युद्धातुन अयोध्येची निर्मिती झाली आहे आणि म्हणूनच ती प्रभू रामाची जन्म भुमी आहे .४९२ वर्षाचा राम भक्तांनी केलेल्या संघर्षाचा इतिहास कोणीही लपवू शकला नाही.एक वचनी,एक पत्नी आणि एक धर्म असलेल्या प्रभु श्री राम आणि त्यांची जन्मभूमी अयोध्येतील सत्य अखेर सत्यात उतरले आहे त्याचा आनंद आता प्रत्यक्षात साकारण्यासाठी सर्वांचे योगदान गरजेचे असल्याचे सांगताना.अयोध्येत झालेले अनेक आक्रमक आणि ४ लाखाहून अधिक रामभक्तांनी दिलेले बलिदान सार्थकी लागत आहे.वडिलांना दिलेला वचन पूर्ण करण्यासाठी प्रभु श्री राम यांनी १४ वर्षे वनवास केला आणि अनवाणी युद्ध करून योद्धा झाले तो इतिहास जागृत ठेवण्यासाठी देशातील प्रत्येक हिंदूने श्री रामाचे मंदिर उभारणी करण्यात सहभाग घ्यावा असे मौलिक मार्गदर्शन केले.

तालुका हिंदु सभा यशस्वी पार पाडण्यासाठी संघटना कार्यकारणी सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.सभेला उपस्थितां करिता शहरातील दानशूर मंडळीने महाप्रसादाचा लाभ दिला.या सभेत अनेक दानशूर व समज मान्यवरांनी मंदिर निर्माण देणगी जाहीर करून जमा केली.उपस्थितांचे स्वागत अध्यक्ष महादेव पाटील यांनी,सूत्रसंचालन व आभार सचिव महेश पवार यांनी मानले.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**





# मुरुडच्या सेतु कार्यालयात आकारली जातेय भरमसाठ नोंदणी फी? ; भा.ज.पा.तर्फे तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

शासकिय दाखले व प्रतिज्ञापत्र नोंदणी फी मध्ये करण्यात आलेली अन्याय कारक दरवाढ कमी करण्यात यावी, नोंदणी कक्ष त्याच दालनात उपलब्ध करून आबालवृद्धांची. गैरसोय टाळावी. याबाबत मुरुड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे तहसीलदार गमन गावित यांना नुकतेच एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुरुडच्या सेतु कार्यालयात गेल्या काही महिन्यांपासून शासकिय दाखले व प्रतिज्ञापत्र नोंदणी फी वाजवीपेक्षा जास्त प्रमाणात आकारली जाते आहे.उदा.प्रतिज्ञापत्र नोंदणी साठी घेण्यात येणा-या ४० रुपये ऐवजी सध्या ८० रुपये फी आकारली जात असून पावती देखील देण्यात येत नाही तसेच सेतु कार्यालयातून अधिक प्रमाणात आकारली जाणारी विविध प्रकारच्या दाखल्यांची फी शासनाच्या नियमानुसार घेण्यात यावी. त्यानुसार सदर दाखल्यांची कलर प्रिंटच देण्यात यावी. याबाबत विचारणा केली असता संबंधितांना उद्धट उत्तरे दिली जातात तसेच सेतु कार्यालय एका बाजूला तर प्रतिज्ञापत्र नोंदणी तहसील कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर असल्याकारणाने आबालवृद्धांना रजिस्टर घेऊन पायपीट करण्यात त्रासाचे व अवघड होते.याबाबत नागरिकांच्या तोंडी तक्रारी आमच्याकडे आल्या आहेत.

ग्राहकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सेतु कार्यालयातील अवास्तव आकारण्यात येणाऱ्या फी बाबत संबंधित ठेकेदाराची चौकशी करण्यात यावी, ग्राहकांना अधिकृत नोंदणी फी पावती मिळावी. सेतु कार्यालयातील कारभार पारदर्शक व्हावा. यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व आबालवृद्धांची गैरसोय लक्षात घेऊन सेतु कार्यालयालगत नोंदणी कक्ष दालन उपलब्ध करून देण्यात यावे. भारतीय जनता पार्टी तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून याबाबत संबंधित अधिकारी कोणती भूमिका घेऊन सर्वसामान्यांना न्याय मिळवून देतात. याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६

## जाहीर प्रसिद्धी

सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झालेली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्या दृष्टीने राज्य सरकारने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात पीर करम अली शाह बाबांच्या ऊरुसानिमित्त अं.भु.क्र. ४५ व छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर मनोरंजनासाठी पाळणे, यांत्रिक खेळ, दुकाने इ. स्वरुपात उत्सव भरवला जातो. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यावर्षीचा ऊरुस सार्वजनिक स्वरुपात भरल्यास कोविड-१९ विषाणूचा प्रसार झपाट्याने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महाराष्ट्र शासनाच्या शासनाने (मिशन बिगेन अगेन) च्या अनुषंगाने दिनांक २९/०१/२०२१ रोजी निर्गमित केलेल्या आदेशान्वये व त्यातील अटी व शर्तीनुसार आदेश जसेच्या तसे पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू राहतील.

तरी, नागरिकांना आवाहन करणेत येते की, कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता पीर करम अली शाह बाबांचा ऊरुस हा या वर्षी सार्वजनिक स्वरुपात साजरा केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब, सदर आदेशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणेत यावी.

**सही/-**
**उप आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र./पमपा/मालमत्ता/२१३/२०२१
दिनांक : ०५/०२/२०२१

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्यास मंजुरी

अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची मागणी केली होती. परंतु अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक ज्या निकषांवर मंजूर करण्यात येतो त्या भूखंडाचा आकार, रस्त्याची रुंदी, वाहतुकीचा उद्भव, वाहतूक प्रवाह इ. निकषांची पूर्तता काही भूखंडांच्या बाबतीत होत नव्हती. याकरिता उपरोक्त निकषांच्या संदर्भात सिडकोतर्फे अभ्यास करण्यात आला. या अभ्यासातील निष्कर्षांवर आधारित अतिरिक्त चटई निर्देशांक मंजूर करण्याबाबतचे धोरण सिडकोकडून आखण्यात आले. या धोरणाची कायदेशीरदृष्ट्या प्रभावी अंमलबजावणी करता यावी म्हणून त्यातील मार्गदर्शक तत्त्वे विकास नियंत्रण नियमावलीतील अधिनियम म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत व त्या अनुषंगाने उपरोक्त अधिनियमातील तरतुदींमध्ये काही बदल करण्यात आले आहेत.

सदर निर्णयामुळे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली असून उपरोक्त निकषांची पात्रता पूर्ण करणाऱ्या भूखंडांना त्याचा लाभ मिळणार आहे. सदर सुधारित अधिनियमांना महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतरच ते अंमलात येतील.

## शिवसेनेचा तहसिल कार्यालयावर मोर्चा

तहसिलदार यांना निवेदन देण्यात आले.या प्रसंगी जिल्हाप्रमुख तथा मा.आमदार मनोहर भोईर यांनी केंद्र सरकारच्या महागाई, पेट्रोल-डिझेलचे वाढणारे दर, कामगार विरोधी कायदे, खाजगीकरण, शेतकरी कायद्या विरोधी धोरणांचा आपल्या भाषणातून निषेध व्यक्त केला.

सदर निषेध मोर्चा प्रसंगी तालुका संपर्कप्रमुख जे.पी.म्हात्रे, उरण नगरपालिका गटनेते गणेश शिंदे, पंचायत समिती सदस्य हिराजी घरत, उपतालुका प्रमुख जयवंत पाटील, प्रदीप पाटील, उपतालुका संघटक के एम् घरत, शहरप्रमुख विनोद म्हात्रे, मा.शहरप्रमुख महेंद्र पाटील, वाहतूक तालुका अध्यक्ष चेतन म्हात्रे, ग्राहक सं.कक्ष पंकज सुतार, विभागप्रमुख एस. के. पुरो, संदेश पाटील, नगरसेवक अतुल ठाकूर, नगरसेविका वर्षा पाठारे, शहर संघटक दिलीप रहाळकर, महिला संघटक ममता पाटील, महिला तालुकासंघटक भावना म्हात्रे, शहर संघटिका सुजाता गायकवाड यांच्यासहआजी माजी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणगाव महावितरण केंद्रावर भाजप पक्षाचा मोर्चा

चक्री वादळात मोठ्या प्रमाणात झालेली गावातील लाईट पोल. डीप्याचे. नुकसान झाले होते गांवा गांवात एक महिने दोन दोन महिने लाईटच नव्हती हे पोल लावण्यासाठी महावितरण कंपणीला प्रतेक गावातील ग्रामस्थानी एकत्र येऊन मदत केली चार चार पाच पाच दिवस कोरोना निसर्ग वादळाचे महा संकट असताना देखील श्रमदान केले.

परंतु या कामासाठी केंद्र व राज्य सरकार कडून आलेला लाखो कोटी रूपयाचा माणगांव तालुक्याला निधी हा आयता काही न करता ठेकेदाराच्या खिशात गेला असल्याचे सागीतले. याची महावितरण कंपनी केंद्र माणगांव यांच्या कडे मागीतली असता ते ही माहीती देण्यास टाळा टाळ करत आहेत असे शेवटी बोलताना सांगितले. यावेळी योगेश सुळे, ता,सरचिटणीस राजू मुडे शहर अध्यक्ष तालुका नाना महाले, सुरेद्र साळी बाबुराव चव्हाण, संजय जाधव, शर्मिला सत्वे महिला अध्यक्षा भाजप माणगांव तालुका, यशोधरा गोडबोले जिल्हा सदस्य भाजप स्मिता भोईर, जिल्हा सदस्य दिपाली जाधव, उमेश साटम, निलम काळे, विशाल गलाडे, यावेळी माणगांव महावितरण केंद्राचे उप विभागीय अभियांता हे उपस्थित न राहिल्याने भाजपच्या कार्यकत्याने जाब विचारत गोधळ घातला.यावेळी सहाय्यक अभियांता माणगांव महावितरण यानी निवेदन घेऊन पुढे विजबिलात सुट देऊ असे भाजप कार्यकत्यानां आश्वासन दिले.

## 'महावितरण' कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी व्हावे

वांजळे, कोडेंपंचतन अशी जवळ जवळ पन्नासहून अधिक गाव, वाडयांचा समावेश आहे.

या परीसरातील कोणत्याही वीज समस्ये बाबत ग्राहकांना तक्रार करावयाची असल्यास त्यांना एस. टी. स्थानकापासुन एक - दीड किलोमीटर चे चालत येणे म्हणजे उन्हा - पावसाळी महावितरण ची शिक्षाच. याशिवाय मनस्ताप सहन करत कार्यालयात पायी किंवा रीक्षानी जाण म्हणजे आणखी खीशाला भुर्दड अशी अवस्था वीज ग्राहकांची होत आहे. हे केवळ वीज कार्यालय लांब असल्यामुळे, या सर्व समस्येकडे गोरेगाव मुख्य कार्यालय विज वितरण कंपनी अभियंता यांनी विचार करावा असे वीज ग्राहकांचे म्हणणे आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# सारांश

मौजे : माणघर,ता.पनवेल येथील सर्वे क्र. ८०/१, ८२/१, ८३, ८४/१, ८४/२, ८५ अंतर्गत एकूण क्षेत्र १-२६-६० हे.आर. ही जमीन नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक असून सदर जमीनीचे भूसंपादन प्रस्तावित आहे. सदर भूसंपादन शहर व औद्योगिक विकास महामंडळ, अर्थात सिडको करीता नवीन भूसंपादन कायदयांतर्गत करण्यात येत आहे.

नवी मुंबई हे शहर मुंबईची गर्दी कमी करण्याचे साधन राहिळे नसून एक आकर्षण केंद्र बनले आहे. नवी मुंबईचा अंर्तभाव आता स्मार्ट सिटीच्या यादीमध्ये झाला आहे. यामुळे नवी मुंबई प्रकल्पाचा विस्तार नवीन टप्प्यावर पोचला आहे. खऱ्या अर्थाने मुंबईला पर्याय म्हणून हे शहर विकसित झाले आहे. नवी मुंबई विमानतळाच्या कामाने वेग घेतला असून याचा मोठा फायदा आजूबाजूच्या गावांना होणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे निर्माण कार्य प्रगतीपथावर असल्याने पारगाव गावाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. विमानतळ परिसरात लागणार्या सोयीसुविधांकरीता दापोली गावातील जमीन भूसंपादनाकरीता प्रस्तावित आहे.

सदर जमीनीवर किती खातेदारांची मालकी आहे, जमीनीवरील घरे, दुकाने, शेती किंवा मोकळी पडीक जागा आहे का याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. खातेदारांचा व गावकऱ्यांचा सदर भूसंपादनाला तीव्र विरोध आहे. त्यांनी कोणतीही माहिती देण्यास नकार दिला. खातेदारांनी सिडकोशी पत्रव्यवहार केला आहे. त्यांना २२.५% योजनेप्रमाणे लाभ अपेक्षित आहेत. गावकऱ्यांची मागणी आहे की सिडकोच्या अधिकाऱ्यांनी गावात येऊन कोणते लाभ मिळतील याची माहिती दयावी.

माणघर हे गाव पनवेलपासून ७ कि.मी. अंतरावर आहे. या गावाची बरीच जमीन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रकल्पाकरीता संपादित करण्यात आली आहे. गावठाण व लोकवस्ती आता थोडी शिल्लक असून २०११ च्या जनगणनेनुसार ३७२ घरे आहेत. मात्र अनेक लोकं गाव सोडून अन्य ठिकाणी स्थलांतरीत झाले आहेत. सध्या १०० घरे असतील. आजूबाजूला वेगाने नागरीकरण झाल्यामुळे शेती व्यवसाय पूर्वीच बंद पडला आहे. नागरिक विविध व्यवसाय व नोकरीधंद्यामध्ये गुंतलेले दिसतात.

मौ.माणघर, ता.पनवेल गावातील प्रस्तावित भूसंपादन हे सामाजिक प्रयोजन आहे का हे ठरविण्यासाठी खालील मुद्यांचा विचार करण्यात आला.

१. सदर भूसंपादन हे नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी आहे. नवी मुंबई विमानतळ प्रकल्प हा शहरीकरणाचा व पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. नवीन भूसंपादन कायदयानुसार शहरीकरण व संदर्भीय विकास हे सामाजिक प्रयोजन आहे.

२. नवी मुंबईची झपाटयाने होणारी वाढ व स्मार्ट सिटीमधील अंर्तभाव लक्षात घेता नवी मुंबई प्रकल्प हा दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करीत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे या गावाला महत्व आले आहे. विमानतळ परिसरातील नागरी सुविधांकरीता सदर जमीनीची नितांत आवश्यकता आहे.

३. सदर जागेचा वापर विविध नागरी सुविधांकरीता होणार असल्याने अंतिमत: याचा लाभ समाजाला होणार आहे.

४. विमानतळ बाधित गावांना लागून असलेली सदर जमीनीएवढी मोठी, सलग व योग्य जमीन जवळपास अन्य कोठेही उपलब्ध नाही.

५. सदर जमीनीच्या जवळ नजीकच्या काळात आंतरराष्ट्रीय विमानतळ होणार असल्याने या ठिकाणी नियोजित नागरी सुविधांचा लाभ समाजातील सर्वच स्तरातील लोकांना होईल.

या सर्व मुद्यांचा विचार करीता सदर भूसंपादन हे सामाजिक प्रयोजन आहे याची खात्री पटते.

**सकारात्मक परिणाम:**

१. नवी मुंबईच्या स्मार्ट सिटी योजनेतंर्गत होणाऱ्या विकास कामांचा व नागरी सोयीसुविधांचा लाभ सामान्य नागरिकांना होणार आहे.

२. सदर भूसंपादन शहरीकरणांतर्गत नागरी सोयीसुविधांकरीता करण्यात येत असून हे सामाजिक प्रयोजन आहे.

३. सदर जमीनीवर कोणतीही लागवड करण्यात आलेली नाही. तसेच सदर जमीनीतून कोणतेही शेती आधारित उत्पन्न घेतले जात नाही.

४. सदर जमीनीवर कोणतेही आरक्षण नाही तसेच वन विभागाकडून कोणतीही हरकत घेतलेली नाही.

५. सदर जमीनीबर कोणती पायाभूत सुविधा आहे किंवा नाही व ती' बाधित होते का याची माहिती नाही.

६. सदर जमीनीची मालकी किती कुटुंबांकडे आहे, याची माहिती नाही. तसेच कोणते कुटुंब सदर जमीनीवर आर्थिकदृष्टया अवलंबून आहे का याची माहिती मिळू शकली नाही.

७. सदर जमीनीवर कोणतेही कुटुंब प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अवलंबून आहे किंवा नाही हे समजू शकले नाही.

**नकारात्मक परिणाम::**

१. प्रस्तावित जमीनीच्या भूसंपादनामुळे गावातील किती खातेदार विस्थापित होतील व त्यांच्या पुर्नसनाकरीता किती खर्च हीईल हे माहिती अभावी सांगता येणार नाही.

२. खातेदारांची सदर भूसंपादनाला तीव्र हरकत आहे. त्यांनी सिडकोला याबाबत पत्र पाठवून विरोध दर्शविला आहे.

३. प्रस्तावित जमीन गावठाणाला लागूनच असल्याने येथे विमानतळाकरीता सोयीसुविधा बांधल्यास योग्य पोहोच रस्ता राहणार नाही.

४. प्रस्तावित जमीनीचा वापर नेमक्या कोणत्या कामासाठी होणार आहे हे सिडको कडून स्पष्ट नाही.

या व्यतिरिक्त, प्रस्तावित जमीन संपादनामुळे अन्य कोणताही नकारात्मक परिणाम दिसून येत नाही.

**सामाजिक परिणाम व्यवस्थापन व उपाययोजना** :

१. प्रस्तावित जमीनीच्या भूसंपादनामुळे गावातील किती खातेदार विस्थापित होतील व त्यांच्या पुर्नसनाकरीता किती खर्च होईल हे माहिती अभावी सांगता येणार नाही.

२. प्रस्तावित जमीनीवर कोणत्या सार्वजनिक सोयीसुविधा होणार आहेत याची माहिती सिडकोने दिलेली नाही. त्यामुळे सदर भूसंपादनाची खरोखर किती निकड आहे याची स्पष्टता नाही.

३. प्रस्पावित जमीन गावठाणला लागूनच असल्याने येथे विमानतळाकरीता सोयीसुविधा बांधल्यास योग्य पोहोच रस्ता राहणार नाही. यासाठी कदाचित आणखी जमीनीची आवश्यकता आहे का याची स्पष्टता नाही.

४. खातेदारांना सदर भूसंपादनापोटी कोणते लाभ मिळणार आहेत, जमीनीचा किती मोबदला मिळेल, पर्यायी घर कुठे मिळेल याबाबत सिडकोकडून स्पष्टता हवी आहे. त्यांनी याबाबत पत्र पाठवून माहिती मागितली आहे.

प्रस्तावित भूसंपादन सुगमपणे होण्यासाठी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांशी चर्चा करण्याची आवश्यकता आहे. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रस्तावित भूसंपादनाची आवश्यकता, प्रस्तावित सोयीसुविधा व गावाला मिळणारा लाभ याविषयी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट कल्पना दयावी.

प्रस्तावित भूसंपादन सुगमपणे होण्यासाठी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी गावकर्यांशी चर्चा करण्याची आवश्यकता आहे. लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी प्रस्तावित भूसंपादनाची आवश्यकता, प्रस्तावित सोयीसुविधा व गावाला मिळणारा लाभ याविषयी सिडकोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट कल्पना दयावी.

या व्यतिरिक्त, अन्य कोणत्याही उपाययोजनेची आवश्यकता दिसत नाही. या सर्व बाबींचा विचार करीता सदर जमीन भूसंपादनासाठी खातेदारांशी चर्चा करून लवकरात लवकर कार्यवाही करावी अशी शिफारस या सामाजिक परिणाम निर्धारण अहवालादवारे करण्यात येत आहे.

नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया अनिवार्य असून याप्रमाणे सदर अहवाल सोशिओक्रेस्ट सोल्यूशन्स, पनवेल यांच्यातर्फे सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद !

**सही/-**
**अपर्णा ताम्हनकर**
**संचालिका, सोशिओक्वेस्ट सोल्यूशन्स**

क्र.जिमाका/राज/जाहि/१४०/२०२०-२१

# पाली बल्लाळेश्वराचा माघी गणेश उत्सव होणार कोरोनाचे नियम पाळून



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येत्या १५ फेब्रुवारीला होणारा माघी गणेशोत्सव कोरोनाचे नियम पाळून साजरा होणार आहे. मात्र यात्रा आणि काही उपक्रम होणार नाहीत. यासंदर्भात पाली तहसील कार्यालयात नुकतीच प्रशासन, पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थान विश्वस्त आणि पदाधिकाऱ्यांची नियोजन बैठक संपन्न झाली. यावेळी माघी महोत्सवानिमित्त प्रशासन व देवस्थान यांच्या समन्वयातून उत्कृष्ट नियोजनाबाबत चर्चा झाली. फेब्रुवारी महिला उजाडला की भाविक भक्तांना माघी महोत्सवाचे वेध लागलेत. यावर्षी महोत्सवात अलोट गर्दी लोटणार असल्याचा अंदाज घेऊन अचूक पूर्वनियोजन केले जात आहे.

यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ऍड. धनंजय धारप म्हणाले की यावर्षी माघी गणेशोत्सव १३ फेब्रुवारी पासून सुरुवात होणार असून १६ तारखेपर्यंत कोरोनाचे नियम व अतिशर्थी पाळून चालणार आहे. तर तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी सांगितले की कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यात्रा आणि धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. परिणामी उत्सवात यावर्षी यात्रेसाठी अथवा रस्त्यावर दुकाने लावण्यासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी नाही. त्याचप्रमाणे जन्म सोहळ्याच्या कीर्तनास फक्त मोजके भाविक उपस्थित राहतील. यावर्षी श्री गणेशाची पालखी देखील कोणताही गाजा-वाजा न करता साधेपणाने गाडीतून निघेल. तसेच पालखी रस्त्यात कोठेही थांबणार नसून लोकांनी पालखीस न ओवाळता फक्त नमस्कार करावे. तसेच भाविकांसाठी महाप्रसाद यावर्षी होणार नाही अशी माहिती देखील रायन्नावार यांनी दिली. या नियोजन बैठकीस तहसीलदार दिलीप रायन्नावार, पोलीस निरीक्षक विजय तायडे, बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष ऍड. धनंजय धारप, विश्वस्त राहुल मराठे, विनय मराठे, सचिन साठे यांच्यासह शेखर सोमण, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी महेश घबाडी, नगरपंचायत कर्मचारी रोशन जोशी, आरोग्य व इतर विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# मुरुडमध्ये भा.ज.पा.तर्फे महावितरण विरोधात टाळा ठोको व हल्लाबोल आंदोलन



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी त्यांना वेठीस धरून कारभार चालविण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने चालविले आहे. याचा निषेध करण्यासाठी आणि वीजग्राहकांना न्याय मिळवून देण्यासाठी भा.ज.पा.चे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड.महेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, शहर अध्यक्ष उमेश माळी यांनी आज आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुड मधील महावितरण ला टाळे ठोकून, हल्लाबोल आंदोलन केले. यानंतर वीज अभियंता सचीन येरेकर यांना एक निवेदन देण्यात आले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, गेल्या मार्च २०२० पासून संपूर्ण जगात कोरोना महामारीने थैमान घातले आहे. त्यामुळे संपूर्ण देशात मार्च पासून लॉकडाऊन करण्यात आले.या पाच महिन्यांत जनतेकडे कोणतेही आर्थिक मिळकतीचे स्त्रोत नसल्याने परिस्थिती अत्यंत नाजूक झालेली आहे. त्यातच तीन जून रोजी झालेल्या निसर्ग चक्रिवादळामुळे नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे आर्थिक कंबरडे मोडले असताना महावितरणने जुलै २०२० पासून सरासरी प्रमाणे मोठ्या प्रमाणात वीज आकारणी करुन बीले दिली आहेत तसेच ऑगष्ट २०२० मध्ये जी भरमसाठ बीले आकारण्यात आली आहे.त्याबाबत वेळोवेळी आपल्या कार्यालयात पत्रव्यवहार करून वीज ग्राहकांना वीज बिलात सवलत न देता उलट ७५ लाख वीज ग्राहकांचे वीज कनेक्शन तोडण्याची नोटीस पाठवून महाराष्ट्रातील चार कोटी जनतेला अंधारात टाकण्याचे काम आपण करत आहात. त्याबाबत मुरुड तालुका भारतीय जनता पार्टी तर्फे आपले महावितरण विरोधात टाळा ठोको व हल्लाबोल आंदोलन करीत असल्याचे निवेदनात म्हटले असून वीज ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने त्यांचेवर अन्याय होऊ न देता याची गांभीर्याने दखल घेऊन शासनाकडून वीज बिलात सवलत देण्याकरिता कार्यवाही करण्यात यावी.असे भारतीय जनता पार्टी तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यावेळी भा.ज.पा.तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, भटक्या विमुक्त जाती रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश काते, शहर अध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष विनोद (बाळा)भगत, सरचिटणीस नरेश वारगे, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, हनिफ उलडे, जनार्दन खोत, जीवन सुतार,सुदाम वाघिलकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उरण वाहतूक पोलिसांच्या वतीने टाऊनशिप रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण वाहतूक पोलिसांच्या वतीने जेएनपीटी टाऊनशिप येथील बहुउद्देशीय सभागृह येथे रस्ते सुरक्षा सप्ताह अभियानांतर्गत आज ६ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ९: ३० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रस्त्यावर नियमित होणारे अपघात त्यामध्ये बळी पडणारे अपघातग्रस्त आणि विविध प्रकारच्या उद्भवणाऱ्या आजारातील रुग्णांना तात्काळ रक्तपुरवठा या हेतूने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.उरण वाहतूक शाखेच्या या रक्तदान शिबिरासाठी नवीमुंबई महानगर पालिका रुग्णालय वाशी येथील रक्तपेढी सहकार्य करणार असून, या रक्तदान शिबीरात तालुक्यातील नागरिकांनी सहभागी होऊन आपले अतिशय मौलाचे रक्तदान करावे असे आवाहन उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ निरीक्षक माणिक नलावडे यांनी केले आहे.

# संक्षिप्त...

## हळदीकुंकू समारंभाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील वैश्यवाणी- एक हात मदतीचा या संस्थेतर्फे वैश्य समाज हॉल, मिरची गल्ली पनवेल येथे हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ७ फेब्रुवारी २०२१ रोजी सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष प्रदीप (बापू) दलाल आणि उपाध्यक्ष हर्षदा तांबोळी यांनी केले आहे. या हळदीकुंकू समारंभचे खास आकर्षण म्हणजे स्टार प्रवाह मालिकेतील फुलाला सुगंध मातीचा मधील अभिनेत्री ऐश्वर्या शेटे उपस्थित राहणार आहेत.

## रायगड जिल्ह्यातून तडीपार झालेल्या आरोपीस स्थागुशाकडून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**



मा.उपविभागीय अधिकारी, महाड विभाग, महाड यांच्याकडील हद्दपार प्रस्ताव क्रमांक १/२०१९ कलम महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ (अ)(१) अन्वये दिनांक २०/८/२०२० अन्वये इसम नामे शिवकुमार रविंद्र गुरव रा.बिरवाडी ता.महाड यास रायगड जिल्ह्यातून दि.२०/०८/२०२० रोजी १ वर्षाकरता तडीपार करण्यात आले होते. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेकडे पोलीस उपनिरीक्षक श्री निकाळजे यांना वरील हद्दपार आरोपी हा त्याच्या गावी आला असल्याचे समजल्यानंतर त्यांनी टीमसह जाऊन त्याला त्याच्या गावातून ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो आरोपी वरील हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून विनापरवाना हद्दपार हद्दपार कालावधीत रायगड जिल्ह्यात आला असल्याचे दिसून आले म्हणून त्यास ताब्यात घेऊन महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे हजर करून त्याच्याविरुद्ध महाड एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.नं ११/२०२१ कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे अशी माहीती पोलीस सुत्रांकडुन देण्यात आली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती.मंजुळा अनंता पाटील रा.रुम नं.२९८, पुनाडे, भैरीदेवी मंदिराजवळ, पो.केळवणे, ता.उरण, जि.रायगड यांनी दिलेल्या माहिति व अधिकाराप्रमाणे सदरची प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांचे पती कै.अमर अनंता पाटील ह्यांचे मालकी हक्क असलेल्या मिळकतीचे वर्ण्रन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

| वाहन कंपनी | चेसीस नं. | मॉडेल नं. | इंजिन नं. | इंधन प्रकार | इंधन क्षमता | बॉडी प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| TVS | MD626CG52L1B16336 | JUPITER CLASSIC BSVI | CG5BL1713867 | PETROL | 110 | SOLO |

सदरील वर नमूद मिळकत ही आमचे अशिलांचे पती कै.अमर अनंता पाटील हे दि.११/१२/२०२० रोजी मयत झाले असून वर नमूद मिळकत ही त्यांचे नावे असून सदर मिळकत ही त्यांचे पश्चात त्यांची पत्नी या नात्याने श्रीमती.मंजुळा अनंता पाटील त्यांचे नावे होणे गरजेचे आहे.

तरी सदर वर नमूद मिळकतीचे मालक कै.अमर अनंता पाटील त्यांना आमचे अशिल श्रीमती.मंजुळा अनंता पाटील ही वारस पत्नी असून सदर मिळकती ही त्यांचे नावे होणे गरजेचे झाल्याने त्यांनी मला दिलेल्या अधिकारानुसार सदरची नोटीस अन्य कोणाचीही हक्क हितसंबंध आहेत का हे पाहणेकामी प्रसिद्ध करणे कायद्याने उचित झाले आहे.

तरी नमूद मिळकतीमध्ये आमचे अशिला व्यतिरिक्त अन्य कोणाचे हितसंबंध, हक्क व अधिकार गुंतलेले असल्यास त्याबाबत शहानिशा करण्याचे कामी सदरची जाहीर नोटीस देणे हे आम्हास क्रमप्राप्त झाले आहे.

तरी सदरची नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ८ दिवसाच्या कालावधीमध्ये कोणाची हरकत असल्यास विहित मुदतीमध्ये कुळवावे.
दि.०५/०२/२०२१

**सही/-**
**ॲड.राजकुमार व्ही.जाधव**
**शॉप नं.२१, पहिला मजला,**
**नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११५/२०२१
ने.ता.०६/३/२१

श्री.विठ्ठल पदू कोंडीलकर
वय : ३९, व्यवसाय : नोकरी
राहणार : घर नं.६२ गाव-देवळोली (सावळे)
रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत देवळोली सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्ज श्री.विठ्ठल पदू कोंडीलकर यांचा जन्म दि.१८/०६/१९८२ रोजी अर्जदार यांच्या राहत्या घरी घर नं.६२, गाव : देवळोली (सावळे), रसायनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झाला होता. अर्जदार श्री.विठ्ठल पदू कोंडीलकर यांची जन्माची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू श्री.विठ्ठल पदू कोंडीलकर या वर नमूद ठिकाणी जन्म झालेला आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि.०१/०२/२०२१ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

# पेट्रोल डिझेल गॅसची दरवाढी विरोधात शिवसेनेचे पेण येथे आंदोलन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेट्रोल डिझेल व गॅसची भरमसाठ दरवाढ करणाऱ्या मोदी सरकारच्या विरोधात पेण तालुका शिवसेना आक्रमक झाली असून शिवसेनेने पेण शहराच्या एसटी स्थानकासमोर आंदोलन करून मोर्चा काढून निषेध केला.

यावेळी मोदी सरकार हाय हाय, पेट्रोल-डिझेलची दरवाढ करणाऱ्या मोदी सरकारचा धिक्कार असो, पेट्रोल डिझेल गॅस दरवाढ मागे घ्या, अशा घोषणा देण्यात आल्या. पेणच्या मुख्य रस्त्यांवरून काढलेल्या या मोर्चामध्ये पेट्रोल-डिझेलची दरवाढीचा फटका बसलेले सामान्य नागरिकनीही सामील झाले होते. पेट्रोल डिझेलच्या किमतीत प्रचंड भाव वाढ झाल्यामुळे दुचाकी व चारचाकी गाडी वापरणे सामान्य माणसाला परवडत नसल्याने सदरच्या गाड्यांमध्ये पेट्रोल न टाकता धक्का मारून गाड्या नेऊन निषेध व्यक्त करण्यात आला.




पेट्रोल डिझेलचे भाव वाढल्याने वाहतुकीचा खर्च वाढला आहे व त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंसह सर्वच्या सर्व गोष्टींच्या किमती वाढल्या आहेत. रोज होत असलेला दरवाढीमुळे सामान्य नागरिकांचे जिवन मुश्कील झाले आहे. कोरोना व लॉंकडाऊन मुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या सामान्य नागरिकांवर मोदिसरकार दरवाढ करून हा अतिरिक्त बोजा टाकत असल्याने सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेना रस्त्यावर उतरली आहे अशी प्रतिक्रिया यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड व तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे यांनी दिली.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या आंदोलनात तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप पाटील, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, विधानसभा संघटक बाळा म्हात्रे, उपतालुकाप्रमुख भगवान पाटील, जयराज तांडेल, संतोष पाटील, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, ग्राहक संरक्षणचे नंदू मोकल, लकी बोहरा, प्रसाद देशमुख, विजय पाटील, ज्येष्ठ शिवसैनिक धाया म्हात्रे, गडब शाखाप्रमुख सुशीला म्हात्रे, विभाग प्रमुख राजा म्हात्रे, गजानन मोकल, विषाल दोषी यांच्यासह शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेट्रोल डिझेल व गॅस वरील अन्याय दरवाढ ताबडतोब केंद्र सरकारने मागे घ्यावी असे निवेदन पेणच्या तहसीलदार अरुणा जाधव यांना यावेळी देण्यात आले.

## पंधरा हजार डॉलर मिळविण्याच्या नादात गमावले १०.७८ लाख खांदा कॉलनीतील व्यक्तीला अज्ञात भामट्याने घातला गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन हजार डॉलर गुंतविल्यास महिन्याभरात त्याच्या दुप्पट डॉलर देण्याचे अमिष दाखवून एका भामटयाने खांदा कॉलनीत रहाणाऱ्या एका व्यक्तीला तब्बल १० लाख ७८ हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात भामटयाविरोधात फसवणुकिसह अपहार तसेच आयटी ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेले सुर्यकांत चव्हाण (५०) हे खांदा कॉलनीमध्ये राहाण्यास असून ते रेल्वेमध्ये नोकरीला आहेत. त्यांच्या मोबाईल फोनवर गॅलेक्सी एफएक्स या कंपनीमध्ये २ हजार डॉलर गुंतविल्यास ३०० ते ५००० हजार डॉलर प्रतिदिन कमाविण्याचे अमिष दाखविणारा मेसेज आला होता. त्यामुळे चव्हाण यांनी सदर मोबाईल नंबरवर संपर्क साधला असता, विशाल नावाच्या व्यक्तीने त्यांची गॅलेक्सी एफएक्स ही कंपनी आंतरराष्ट्रीय चलनामध्ये चढ-उतारावर बेटींग करत असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी सदर कंपनीत २००० डॉलर गुंतविल्यास एका महिन्यामध्ये त्यांचे डॉलर डबल होतील असे अमिष दाखविले. त्यानंतर भामटया विशालने चव्हाण यांना एक लिंक पाठवून गॅलेक्सी एफएक्स हे ॲप त्यांच्या मोबाईलवर डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यानंतर भामटया विशालने चव्हाण यांना आणखी एक लिंक पाठवून त्यावर त्यांना १००० डॉलर भरण्यास सांगितले. त्यानुसार चव्हाण यांनी ७३,९०० रुपये भरले. त्यानंतर १५ दिवसानंतर चव्हाण यांनी ॲपवर जाऊन पहाणी केली असता, त्यांच्या खात्यात २००० डॉलर झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी २०० डॉलर काढण्याबाबत विशालकडे विचारणा केली असता, त्याने त्यासाठी १५ टक्के कमिशन द्यावे लागतील असे सांगून १२ हजार ५६४ रुपये कमिशन कापून उर्वरीत रक्कम त्याच्या खात्यावर ट्रान्सफर केली. त्यानंतर भामटया विशालने चव्हाण यांना १५००० डॉलर गुंतविल्यास त्यांच्या खात्यात कंपनीतर्फे आणखी १५००० डॉलर जमा केले जातील असे अमिष दाखविले. त्यानुसार चव्हाण यांनी विशालच्या सांगण्यानुसार वेगवेगळ्या बँक खात्यातून तब्बल १० लाख ८३ हजार रुपयांची रक्कम गॅलेक्सी एफएक्सच्या खात्यावर जमा केली. त्यानंतर विशालने कंपनीकडून त्यांच्या खात्यात १५००० डॉलर जमा करण्यास दोन दिवस लागणार असल्याचे सांगून दोन दिवस त्यांना सदर खात्यातून पैसे काढता येणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे चव्हाण यांनी दोन दिवसानंतर गॅलेक्सी एफएक्स या कंपनीचे ॲप उघडून पाहिले असता, त्याच्या खात्यावर फक्त १७ डॉलर असल्याचे त्यांना दिसले. त्यामुळे चव्हाण यांनी विशालला संपर्क साधला असता, त्याने कंपनीकडून काही तांत्रीक अडचण निर्माण झाल्याचे सांगून लवकरच त्यांच्या खात्यात ३०,००० डॉलर जमा होतील असे सांगितले. मात्र, त्यानंतर देखील सदरची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली नाही. तसेच विशालचा फोन देखील बंद असल्याचे आढळुन आले. त्यानंतर चव्हाण यांच्या मुलाने गॅलेक्सी एफएक्स या कंपनीबाबत माहिती घेतली असता, ती कंपनी बोगस असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे चव्हाण यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## पनवेल तालुका महिला काँग्रेस अध्यक्षपदी सौ.सपना नंदराज मुंगाजी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष आर सी घरत यांच्या आदेशानुसार पनवेल शहर जिल्हा महिला कॉंग्रेस च्या वतीने हळदीकुंकु कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष नंदराज मुंगाजी, रायगड युवक अध्यक्ष हेमराज म्हात्रे, रायगड जिल्हा महिला कॉंग्रेस अध्यक्षा ॲड.श्रध्दा ठाकुर, मोनिका पाटील,नयना घरत, संध्या ठाकुर, रेखा घरत सीमा ठाकुर, निर्मला पाटील यांच्यासह कॉंग्रेसचे सर्व पदाधिकारी, जिल्हा कमिटीच्या महिला पदाधिकारी तसेच बचत गट आणि महिला वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

दरम्यान या कार्यक्रमात सौ. सपना मुंगाजी यांची पनवेल तालुका महिला कॉंग्रेस अध्यक्षा पदी नेमणूक करण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व पनवेल शहर जिल्हा महिला कॉंग्रेस कमिटी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याबाबत पनवेल शहर जिल्हा महिला कॉंग्रेस अध्यक्षा निर्मला म्हात्रे यांनी सर्वांचे आभार मानले.

मा.पाठक सो.
वकील श्री.मितुल चं.लव्हेकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय व.स्तर, मा.यु.ए.पाठक सो. पनवेल यांचे कोर्टात
स्पेशल मु.क्र.७९/२०१२
नि.नं.२२/ड
ने.ता.१८/३/२१

श्री.अतुल चंद्रकांत लव्हेकर अर्जदार
विरुद्ध
श्री.नामदेव कि.म्हात्रे आणि इतर सामनेवाला
प्रति,
श्री.रवींद्र गावंड
रा.मे.आर.जी.बिल्डर्स ॲण्ड डेव्हलोपर्स,
स्वाती पार्क जवळ, किल्ला गावठाण, सेक्टर १५ अ,
बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

वरील अर्जदार श्री.अतुल चंद्रकांत लव्हेकर ह्यांनी सदरचा चौकशी अर्ज पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय व.स्तर यांचे कोर्टात वर नमूद सामनेवाला नामदेव कि.म्हात्रे आणि इतर यांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. सदरच्या चौकशी अर्जात वर नमूद रवींद्र गावंड यांना सामनेवाला क्र.७ बनविण्यात आले आहे.

आपल्याला पारंपारिक पद्धतीने नोटीसीची बजावणी करता येत नसल्यामुळे वैयक्तीक सर्व्हिसचा वापर करीत आहेत.

सदरचा चौकशी अर्ज अर्जदाराने तुमच्या आणि अन्य इसमांच्या विरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच आपल्याला सदरचे नोटीस बजाविण्यात येत आहे. तरी आपण स्वतः किंवा वकीलामार्फत आपली बाजू मांडण्याकरिता दि.१८/०३/२०२१ रोजी सकाळी १० वा. ३० मि. न्यायालयात हजर रहावे. तसेच आपण आपल्या म्हणणे मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे.

तसेच सदरच्या नोटीसीची आपण गांभीर्याने दाखल घेवून मे.न्यायालयात आपले म्हणणे सर्व कागदपत्रांसहीत दाखल करावे. जर आपण मे.न्यायालयात सर्व कागदपत्रांसहीत हजर राहण्यास असमर्थ राहिल्यास आपल्या विरुद्ध सदरचा चौकशी अर्ज एकतर्फी चालविण्याचा आदेश पारित होईल याची आपण नोंद घ्यावी.

आज दि.५/२/२१ रोजी माझ्या सही आणि शिक्क्यासहीत देण्यात येत आहे.

कोर्टाचा शिक्का | सही/- असिस्टंट सुप्रेटेंडेट दि.न्या.व.स्तर, पनवेल

अर्जदारांचे वकील : ॲड.सलमान पटेल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१२९/२०२१
नि.नं.७
ने.ता.१७/३/२१

१) श्रीमती.उषा अशोक कदम
वय : ६७ वर्षे, धंदा : घरकाम
रा.१/१८, कंपाऊंड, दातार कॉलनी रोड,
अशोक नगर, भांडूप पूर्व मुंबई ४०००४२
२) कु.उज्वला अशोक कदम लग्नानंतर
सौ.उज्वला सुशिल बोरकर
वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम
रा.११ बाबा कदम चाळ, कांजूर गाव,
शिवकृपा नगर, भांडूप पूर्व मुंबई ४०००४२
३) कु.शुभांगी अशोक कदम लग्नानंतर
सौ.शुभांगी सुनील सावंत
वय : ४४ वर्षे, धंदा : घरकाम
रा.ए/१/१०३, हिमालया लोकधारा, संकुल
कल्याण काठेमानीवली ठाणे, ४२१३०६
४) कु.अर्चना अशोक कदम लग्नानंतर
सौ.अर्चना नितीन पवार
वय : ४२ वर्षे, धंदा : घरकाम
श्री.विनायक पाटील चाळ, ज्ञानेश्वर मंदिर जवळ,
गौरीपाडा भिवंडी, विद्याश्रम ठाणे ४२१३०५
५) सौ.सचिन अशोक कदम
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.१/१८ कंपाऊंड, दातार कॉलनी रोड,
अशोक नगर, भांडूप पूर्व मुंबई ४०००४२ अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ चे पती आणि अर्जदार क्रं.२ ते ५ चे वडील कै.अशोक धारराव कदम हे दि.१२/०८/२०२० रोजी मौजे : डॉक्टर रोमीन मालवणकर नर्सिंग होम, भांडूप वेस्ट ४०००७८ येथे मयत झालेले आहेत. कै.अशोक धारराव कदम यांच्या मालकीची मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील त्यांचे मालकीची, नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती/शेतजमिनी होत्या.

मिळकतीचे वर्णन
मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| पेंधर | २४८ | १०७ | ६/४ (4) | ०-२६-५ |

मौजे : पेंधर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर वर्णन केलेली शेतजमीन मिळकत सिडकोत संपादीत झालेल्या आहेत. सबब सदर मिळकतीबाबत कै.अशोक धारराव कदम यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारसदाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०५/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## महिंद्रा झायलोची मोटार सायकलला धडक ; १ ठार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिंद्रा कंपनीच्या झायलो गाडीची समोरुन येणाऱ्या मोटार सायकलला धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकलवरील एक इसम मरण पावल्या घटना करंजाडे परिसरात घडली आहे. विरु दास (२४) हा त्याच्या ताब्यातील झायलो गाडी घेवून चालला असताना त्याने करंजाडे येथे मोटार सायकल क्र.एमएच-४६-एएस-३७६२ ला धडक दिल्याने झालेल्या अपघातात या गाडीवरील बाबूलाल शेख (२५) रा.बॉम्बे नाका, हा गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.पाठक सो.
अर्जदारांचे वकील : ॲड.अरविंद चामले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो., पनवेल यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.५८३/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.१०/३/२१

कै.रामा खंडू कोळी (मयत) तर्फे वारस
कै.पदा उर्फ पद्माकर खंडू कोळी (मयत) तर्फे वारस
कै.पद्मीबाई पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस)
१) कै.रघुनाथ पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस)
कै.पदमुबाई रघुनाथ कोळी (मयत तर्फे वारस)
१.१) ज्ञानेश्वर रघुनाथ कोळी
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
२) कै.नरेश पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस)
२.१) जनाबाई नरेश कोळी
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
२.२) रमेश नरेश कोळी
वय : ४८ वर्षे, धंदा : शती
२.३) विनायक नरेश कोळी
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
३) कै.देवकीबाई नामदेव कोळी (मयत तर्फे वारस)
३.१) कृष्णा नामदेव कोळी
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
४) कै.भागाबाई हिरा कोळी (मयत तर्फे वारस)
४.१) चंद्रकांत हिरा कोळी
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
५) कै.आत्माराम पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस)
५.१) जिजाबाई आत्माराम कोळी
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.गव्हाण/बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार क्र.१ ते ५ चे वडील, १.१, २.१ चे सासरे, २.२ व २.३, ३.१, ४.१, ५.१ चे कै.पदा उर्फ पद्माकर खंडू कोळी हे दिनांक २९/०८/१९६९ रोजी मौजे : बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड असून ते येथील कायमचे रहिवासी होते. त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावावर खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन
गाव : गव्हाण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

| क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १) | ३०४ | ९ | ०-०५-०० | ०.२७ |
| २) | ३१२ | ६ | ०-०८-४० | ०.७२ |
| ३) | ३०४ | १२ | ०-०१-०० | ०.०३ |
| | | एकूण | ०-१४-०० | |

व त्यांना पुढील प्रमाणे वारसदार होते व आहेत.

| क्र. | वारसदाराचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| | कै.रामा खंडू कोळी (मयत) तर्फे वारस<br>कै.पदा उर्फ पद्माकर खंडू कोळी (मयत) तर्फे वारस<br>कै.पद्मीबाई पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस) | | |
| १ | कै.रघुनाथ पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस)<br>कै.पदमुबाई रघुनाथ कोळी (मयत तर्फे वारस) | | मुलगा |
| १.१ | ज्ञानेश्वर रघुनाथ कोळी | ३८ | नातु |
| २ | कै.नरेश पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस) | | |
| २.१ | जनाबाई नरेश कोळी | ६५ | सुन |
| २.२ | रमेश नरेश कोळी | ४८ | नातू |
| २.३ | विनायक नरेश कोळी | ४० | नातू |
| ३ | कै.देवकीबाई नामदेव कोळी (मयत तर्फे वारस) | | |
| ३.१ | कृष्णा नामदेव कोळी | ४५ | नातू |
| ४ | कै.भागाबाई हिरा कोळी (मयत तर्फे वारस) | | |
| ४.१ | चंद्रकांत हिरा कोळी | ६५ | नातू |
| ५ | कै.आत्माराम पदा उर्फ पद्माकर कोळी (मयत तर्फे वारस) | | मुलगा |
| ५.१ | जिजाबाई आत्माराम कोळी | ५८ | नातू |

वरील प्रमाणे सदर प्रस्तुत अर्जदार हे मयत कै.पदा उर्फ पद्माकर खंडू कोळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारस संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्रू हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.
दि.३/२/२०२१
ठिकाण : पनवेल

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल